शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे कार्यालय

ठिकाण: समग्र शिक्षा अभियान कार्यालय हॉल, पुणे

विषय : विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे यांचेसमवेत सहविचार सभा इतिवृत्त.

दि. १४.१०.२०२१ वेळ : सायं.५.००वा.

---

गुरुवार दि. १४.१०.२०२१ रोजी सायं.५.००वाजता मा. श्री. औदुंबर उकिरडे, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे., यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे, यांचेसमवेत सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. बैठकीस संघटना पदाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक, माध्यमिक), लेखाधिकारी, अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव व पदनाम |
|---|---|
| १ | श्रीम. मीना शेंडकर, सहा.संचालक, पुणे विभाग, पुणे |
| २. | श्री. धनाजी बुटे, शिक्षण उपनिरीक्षक, पुणे विभाग, पुणे |
| ३. | श्री. हेमंत वाटाडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पुणे विभाग,पुणे |
| ४. | श्री. अनिल फुंदे, लेखाधिकारी, पुणेविभाग, पुणे |
| ५ | श्री. रावसाहेब मिरगणे, प्र.शास्त्र सल्लागार, पुणे विभाग, पुणे |
| ६ | श्री.भास्करराव बाबर, शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद,सोलापूर |
| ७ | श्री.अंकुश शिंदे, उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे |
| ८ | श्री. बी वाय धनवे, उपशिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर |
| ९ | श्री. भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जिल्हा परिषद, अहमदनगर |
| १० | श्रीम.कविता शिंपी, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक, (माध्यमिक) पुणे |
| ११ | श्रीम.अर्चना सरदार, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक, (माध्यमिक) पुणे |
| १२ | श्री. विठ्ठल ढेपे, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक,(प्राथमिक) सोलापूर |
| १३ | श्री. प्रफुल्ल शहा, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक,(प्राथमिक) पुणे |
| १४ | श्रीम. संध्या भोर, अधिक्षक, वेतन व भविष्य निवार्ह निधी पथक,(प्राथमिक) अहमदनगर |
| १५ | श्री. दयानंद कोकरे, लेखाधिकारी लेखापरिक्षण पथक, सोलापूर |
| १६ | श्री. प्रमिला गिरी, लेखाधिकारी, लेखापरिक्षण पथक, पुणे |
| १७ | श्री दिपक प्रधान, लेखाधिकारी, लेखापरिक्षण पथक, अहमदनगर |
| १८ | प्रा.ए.एस.फुंदे, अध्यक्ष, जामखेड, अहमदनगर, पुणे विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना. |
| १९ | प्रा. लक्ष्मण रोडे, सचिव, मंचर |

| | |
|---|---|
| २० | प्रा.भास्करराव ज-हाड, सल्लागार |
| २१ | प्रा. एस टी पवार, सल्लागार |
| २२ | प्रा. मंच्छिद्र दिघे, कार्याध्यक्ष, संगमनेर |
| २३ | प्रा. समीर श्रीमंते,उपाध्यक्ष, पणे |
| २४ | प्रा. किरण खाजेकर, कार्याध्यक्ष, पुणे |
| २५ | प्रा. संतोष फाजगे, निमंत्रक |
| २६ | प्रा.भाऊसाहेब कचरे, उपाध्यक्ष |

सुरुवातीस सर्वांचे स्वागत करुन बेठकीत पुढीलप्रमाणे विषयावर चर्चा करण्यात आली.

विषय क्रमांक १) मुख्याध्यापक स्वाक्षरीचे अधिकार.

- मुख्याध्यापक स्वाक्षरीचे अधिकारी प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयात प्रलंबित असतील तर तात्काळ देण्याची व्यवस्था करावी.

विषय क्र. २) सेवानिवृत्ती विषयक लाभ

- सेवानिवृत्ती विषयक प्रोसेस सहा महिने आधीच सुरु करणेबाबत या कार्यालयाकडून पत्र देण्यात येईल.

विषय क्र. ३) विषय मान्यता, तुकडी मान्यता प्रस्ताव.

- विषय मान्यता, तुकडी मान्यता प्रस्ताव आधीच सहा महिने पाठविणे, तसे या कार्यालयाकडून आपणास पत्र देण्यात येईल.

विषय क्र. ४) दरमहा १ तारखेस वेतन होणेबाबत तातडीने कार्यवाही व्हावी.

- प्रत्येक बैठकीस हा विषय होतो परंतु सोलापूर,पुणे जिल्हयाचे वेतन १ तारखेला होत नाही, याबाबत वेतन पथक अधिक्षक यांना सूचित करण्यात आले की, दोन टप्प्यात वेतनदेयके ट्रेझरीत सादर करणे, (वेळेत आलेली देयके व उशिरा आलेली देयके), यापुढे वेतन उशिरा होणार याची दक्षता घ्यावी.

विषय क्र. ५) फायनल पेमेंटबाबत.

- अधिक्षक, वेतन पथक, यांना सूचित करण्यात आले की, ज्या टेक्निकल अडचणी येतात, त्या वरिष्ठांना कळविणे, यापुढे फायनल पेमेंटला उशीर होणार नाही यांची दक्षता घ्यावी.

विषय क्र. ६) डी सी पी एस स्लीपांबाबत.

- डी सी पी एस स्लीपांच माध्यमिक विभागाचे काम पूर्ण झाले असल्याचे श्रीम. शिंपी, अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे् यांनी सांगितले. ज्युनि.कॉलेजचे डी सी पी एस स्लीपांचे काम चालू आहे.

विषय क्र. ७) सेवापुस्तक पडताळणी

- श्री. दयानंद कोकरे, सिनि.ऑडीटर, सोलापूर यांनी सांगितले की, सर्व कागदपत्रांची पूर्तता असेल तर आठ दिवसात सेवापुस्तक पडताळणी करुन देतो, त्रुटी असल्यास दोन दिवसात कळवितो.
- सेवापुस्तक पडताळणीचे कामकाज प्रलंबित असल्यास तात्काळ पूर्ण करुन देणेबाबत सूचीत करण्यात आले.

विषय क् ८) वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी प्रस्ताव.

- वरिष्ठ वेतनश्रेणी, निवडश्रेणी प्रस्ताव प्रलंबित असल्यास तात्काळ पूर्ण करुन देणेबाबत संबंधिताना सूचित करण्यात आले.

सभेच्या शेवटी उपस्थित सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**(औदुंबर उकिरडे)**
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे